ISSN 2277-8063

June 2019

Vol. VIII/ Issue - II / 2019

# Navjyot

नवज्योत

International Interdisciplinary ResearchJournal
[ Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management]

**Chief Editor**
**Prof. Dr. RavindraP.Bhanage**
Dept. of Political Science,
ShivajiUniversity,
Kolhapur.

**Editor**
**Dr. PyarelalSuryawanshi**
Prof. Rajabhau Deshmukh
Mahavidyala,Nandgaon,(kh)
Dist.-Amravati.

*- Published by-*
**HOUSA Publication,Kolhapur.**

ISSN 2277-8063

# CONTENTS



| S.N. | Subject | Title | Author | P.No. |
|---|---|---|---|---|
| 1 | History | Development of Gender Historiography in Maharashtra : Articulationes of Dr. Sharmila Rege | Dr. Sunita Santosh Khadase | 1 to 9 |
| 2 | Sociology | Water as a Commercial Commodity: An Analysis of Water Plant | Anand Laxman Gadiwadd | 10 to 14 |
| 3 | अर्थशास्त्र | "भंडारा जिल्ह्यातील सनफ्लॅग कंपनीतील कर्मचाऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती" | डॉ. आशा तुकारामजी बानकर | 15 to 16 |
| 4 | राज्यशास्त्र | मानवाधिकार व भारतीय आदिवासी | डॉ. रविंद्र भणगे | 17 to 25 |
| 5 | जनसंवाद व विद्याविभाग | मराठवाड्याच्या विकासामध्ये मुद्रित माध्यमांची भूमिका | साधना रामचंद्र काळे | 26 to 29 |
| 6 | ग्रंथालयशास्त्र | अभिलेखांचे वर्गीकरण [Classification of Records] | मुल्ला जुबेदा यु.<br>डॉ. एन. बी. खोत | 30-34 |
| 7 | मराठी | बहिणाबाईंच्या काव्यातील निसर्गदर्शन व कृषीजीवनातील वास्तव चित्रण प्रा. | डॉ. गिऱ्हे डी. पी. | 35-36 |
| 8 | राज्यशास्त्र | चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास (२००२ ते २०१२) | प्रा. नंदकुमार कोल्हापूरे | 37-42 |

ISSN 2277-8063

# चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास (२००२ ते २०१२)

प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

चंदगड हा तालुका कोल्हापूरच्या दक्षिणेला आहे. त्याच्या सीमा कर्नाटक व गोवा राज्याला लागुन आहेत. या तालुक्याला सिंधुदुर्ग जिल्हयाची सीमा पश्चिमेला आहे. तालुक्यात सहयाद्री पर्वताच्या डोगंर रांगा, दऱ्या घनदाट जंगले आहेत. या लेखामध्ये डोगंराळ भागातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास केलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने १९७४ साली हरीजन वस्ती सुधारणा योजना नावाने ही योजना सुरु केली. या योजनेचे नाव दलित वस्ती सुधारणा योजना असे करण्यात आले. ही महत्त्वकांक्षी योजना चंदगड तालुक्यातील गावांमध्ये पिढयांपिढया मागास समजामध्ये कशी राबविली जाते याचा अभ्यास केला आहे. त्याची उद्दिष्टये खालील प्रमाणे केलेली आहेत.

१. चंदगड तालुक्यातील दलित वस्तीत राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेच्या निधीचा अभ्यास करणे.

२. चंदगड तालुक्यातील दलित वस्तीतमध्ये दलित वस्ती सुधारणा योजनांच्या कार्याचा आढावा घेणे.

या उद्दिष्टांच्या आधारे चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासा करीता खालीलप्रमाणे गृहितके मांडली आहेत.

१. चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी दलित वस्तीत खर्च केला आहे.

२. चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत विविध सुधारणेची कामे केलेली आहेत.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत संशोधनामध्ये सर्वेक्षण व ग्रंथालयीन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे. या लेखात प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे.

**प्राथमिक साधने :** चंदगड तालुक्यातील संशोधनासाठी निवडलेल्या ८ गावातील २४ नागरिकांच्या आणि २० लोकप्रतिनिधींच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. याचबरोबर या गावातील दलित वस्तीला प्रत्यक्ष भेट देवून केलेल्या कार्याचे निरिक्षण केले आहे.

**दुय्यम साधने :** संदर्भग्रंथ, लेख, पुस्तके, जनगणना अहवाल, गॅझेटिअर, शासकीय अहवाल, दैनिक वर्तमानपत्रे, इंटरनेट, जिल्हा परिषदेची दलित वस्ती सुधारणा कार्याची नोंद वही इत्यादी चा समावेश दुय्यम साधनामध्ये करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यात ७९ दलित वस्त्या आहेत. यातील ८ गावमध्ये १५ दलित वस्त्यांचा अभ्यास केला आहे. यामध्ये नवबौध्द (पूर्वाश्रमीचे महार) ८ दलित वस्त्या, मातंग ३, चर्मकार ३, खाटीक १ इत्यादी वस्त्यांमधील राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास केला आहे. या वस्त्यांसाठी ८ गावांची निवड केलेली आहे.

**चंदगड तालुका :** चंदगड हा तालुका कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला आहे. त्याच्या सीमा कर्नाटक व गोवा राज्याला लागून आहेत. या तालुक्याला सिंधुदुर्ग जिल्ह्याची सीमा पश्चिमेला आहे. तालुक्यात सह्याद्री पर्वताच्या डोंगर रांगा, दऱ्या, घनदाट जंगले आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार चंदगड तालुक्याची एकूण लोकसंख्या १,८७,२२० इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या १६,६३० आहे. याचे शेकडा प्रमाण ८.८८% आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात गावांची संख्या १५७ आहे (कोल्हापूर जिल्हा सेन्सस हॅण्डबुक, २०११ : ११). प्रस्तुत संशोधनात संशोधकानें चंदगड तालुक्यातील संशोधनासाठी आठ गावांची निवड केली आहे. या गावांची निवड अनुसूचित जातीतील नवबौद्ध (महार), मातंग आणि चर्मकार वस्तीचा विचार करून निवड केलेली

आहे. त्यानुसार संशोधनासाठी निवडलेल्या गावात राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेविषयीची माहिती खालीलप्रमाणे.

**३.१.१ कुदनूर** : २०११ च्या जनगणनेनुसार कुदनुर गावची लोकसंख्या ४,२२९ इतकी आहे. यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या ३७६ आहे (जनगणना, २०११). याचे शेकडा प्रमाण ८.८९% आहे. या गावात अनुसूचित जातीतील महार, मातंग असे दोन्ही समाज आहेत. महार समाजाच्या तुलनेत मातंग समाजाची लोकसंख्या कमी आहे.

कुदनूर गावात अनुसूचित जातीतील महार, मातंग हे समाज आहेत. महार आणि मातंग या दोन्ही समाजात परस्पर सहकार्याचे संबंध नव्हते. परंतु मातंग समाजाने गावकीचे काम सोडून दिल्यापासून या दोन्ही समाजात ऐक्य व परस्पर सहकार्याचे संबंध निर्माण झाले आहेत. दोन्ही समाज एकत्र येऊन विविध कामे करताना दिसतात.

या गावातील दलित आणि सवर्ण यांच्यात सलोखा आहे. दलित समाजातील लोक शेतमजूरी, बांधकाम मजुरी इत्यादी कामासाठी गावातील सवर्ण समाजाला उपयोगी पडतात. गावातील राजकारणासाठी दलितांमधील लोक गावातील राजकीय गटाला सहकार्य करतात. यातून दलित आणि सवर्ण यांचे परस्परांमध्ये सहकार्याचे आणि सलोख्याचे संबंध आहेत.

दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी तसेच ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील १५ टक्के निधी दलित वस्तीतील सुधारणांसाठी खर्च केला जात नव्हता. मुलाखतीमध्ये, ग्रामपंचायत सदस्यांनी सांगितले की, गावातील, दलित समाजातील लोक जागृत झालेले आहेत. याचा परिणाम दलित वस्तीतील गावातील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे प्रशासनाला भाग पडले आहे. गावामध्ये ग्रामपंचायतीने रस्ते, गटर्स, समाजमंदिर इत्यादी कामे केली आहेत.

**३.१.२ माणगाव** : माणगांव हे चंदगड तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येच्या गावांपैकी एक गाव आहे. माणगावची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३,७२१ इतकी आहे.यातील अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या १,०११ आहे. याचे शेकडा प्रमाण २७.१७% आहे. यामध्ये महार समाजाची लोकसंख्या ८६९ आहे. चर्मकार समाजाची लोकसंख्या १०२ आहे. खाटिक समाजाची लोकसंख्या ३० आहे. सर्वात कमी १० ही लोकसंख्या मातंग समाजाची आहे (जनगणना, २०११).

या गावात विविध धर्माचे आणि जातीचे लोक राहतात. अनुसूचित जातीतील महार, मांग, चांभार आणि खाटीक समाजाचे लोक आहेत. महार आणि मांग समाजाचे संबंध परस्पर सहकार्याचे आहेत. मांग समाज हा संख्येने कमी असल्यामुळे महार समाजाच्या विविध कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो. चर्मकार आणि खाटीक समाज महार आणि मांग समाजातील कार्यक्रम, जयंती, उत्सवात अधिक सहभाग दाखवत नसल्याचे दिसून येते. परंतु या सर्व समाजाचे संबंध परस्पर सहकार्याचे दिसतात.

माणगांवातील विविध धर्माच्या आणि जातीच्या लोकांमध्ये सलोखा आहे. गावातील सर्व समाज सामुहिक हिताला प्राधान्य देतात. सर्व समाजाने ऐक्य घडवून गावचा विकास साधला आहे. या गावातील तंटामुक्तीचे अध्यक्ष शामराव बेनके सलग १५ वर्षे या पदावर आहेत. माणगांव गावात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, आरपीआय, बहुजन वंचित आघाडी इत्यादी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत. यांचा गावच्या व तालुक्याच्या राजकारणात सहभाग दिसतो.

**३.१.३ राजगोळी** : चंदगड तालुक्यातील राजगोळी गावची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३,२२४ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या ३०९ आहे. याचे शेकडा प्रमाण ९.२८% आहे. गावात अनुसूचित जातीतील नवबौद्ध (महार) समाज, चर्मकार समाजाची वस्ती आहे. चर्मकार समाज हा महार समाजापेक्षा अधिक आहे.

या गावात महार आणि चर्मकार या समाजातील संबंध अधिक जवळीकतेचे दिसत नाहीत. परंतु त्यांच्यात परस्पर सहकार्य आहे. दलित आणि सवर्ण या दोन्ही समाजात सलोखा व परस्पर सहकार्याचे संबंध आहेत. या गावात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस,

शिवसेना, भाजप इत्यादी पक्षाचे कार्यकर्ते आहेत. गावामध्ये रस्ते, गटर्स इत्यादी कामे ग्रामपंचायतीने केलेली आहेत.

**३.१.४ कालकुंद्री** : कालकुंद्री गावची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३,०८१ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीतील लोकसंख्या ३१२ आहे. याचे शेकडा प्रमाण १०.१२% आहे. कालकुंद्री गावात महार व मातंग समाजाची वस्ती आहे (जनगणना, २०११).

दलित वस्तीतील मंजूर झालेल्या निधीचे राजकारण केले जाते. आमच्या संबंधीत व्यक्तीकडून निधी मंजूर करून आणला आहे. त्यामुळे आमच्या पसंतीप्रमाणे खर्च केला जाणार आहे, अशी मते मांडली जातात.

या गावातील दलितांमधील मातंग आणि महार यांचे संबंध परस्पर सहकार्याचे आहेत. चर्मकार समाज हा महार समाज आणि मातंग समाजापासून लांब अंतरावर राहतो. हा समाज मागासवर्गीय असल्याने महार आणि मातंग यांच्याबद्दल आपुलकीची भावना दिसते. गावातील मंदिरात सर्वांना प्रवेश नाही. सार्वजनिक कार्यक्रमाला बोलावले जात नाही. सार्वजनिक कार्यक्रमातील जेवणात दलितांचा वाढपी चालत नाही. या गावातील नागरिकांनी सांगितले की, गावातील काही लोक पारंपरिक रूढी–प्रथांचे पालन करतात. परंतु या गावातील दलित आणि सवर्ण यांच्यात परस्पर सहकार्य व सलोखा आहे.

गावातील ग्रामपंचायतीने दलितवस्ती, रस्ते, गटर्स, नळ पाणी पुरवठा इत्यादी कामे केलेली आहेत. ग्रामपंचायतीच्या १५ टक्के उत्पन्नाच्या अनुदानातून दलित समाज व बेरड समाजाला सार्वजनिक जेवणाकरीता मोठी भांडी दिली आहेत. १५ टक्के निधीतून समाजात स्वागत कमान बांधली आहे.

**३.१.५ हेरे** : २०११ च्या जनगणनेनुसार हेरे गावची लोकसंख्या २,१५५ इतकी आहे. यातील नवबौद्ध (महार) समाजाची लोकसंख्या ३२२ आहे. चर्मकार समाजाची लोकसंख्या ३२५ आहे. अनुसूचित जातीतील या दोन्ही समाजाची लोकसंख्या एकूण ६४७ आहे. याचे शेकडा प्रमाण ३०.२३% आहे. गावातील महार समाजातील चर्मकार समाजातील नागरिकांशी चर्चा केली. गावातील मंदिरात नवबौद्ध (महार) समाजातील लोकांना प्रवेश नाही. गावात आजच्या काळातही भेदभाव केला जात आहे.

हेरे गावच्या ग्रामपंचायतीमध्ये ९ सदस्य आहेत. यातील २ सदस्य अनुसूचित जातीतून निवडलेले आहेत. सरपंचपद हे थेट जनतेतून निवडल्यामुळे गावातील ग्रामपंचायतीत १० लोकप्रतिनिधी आहेत. ग्रामपंचायतीने दलित वस्ती सुधारणा योजनेतून रस्ते, गटर्स, नळ पाणी पुरवठा, समाजमंदिर इत्यादी कामे केलेली आहेत. चर्मकार समाजात समाजमंदिर नाही.

**३.१.६ कागणी** : चंदगड तालुक्यातील कागणी गावची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १९३२ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २४२ आहे. याचे शेकडा प्रमाण १२.५२% आहे.या गावातील दलितांचे आणि सवर्णांचे संबंध परस्पर सहकार्याचे आणि सलोख्याचे आहेत. कागणी गावच्या ग्रामपंचायतीने दलित वस्तीत रस्ते, गटर्स, समाजमंदिर इतर कामे केलेली आहेत.

**३.१.७ कार्वे (मौजे कार्वे)** : कार्वे गावची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १६८९ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या १८३ आहे (जनगणना, २०११). याचे शेकडा प्रमाण १०.८३% आहे. गावातील अनुसूचित जातीत नवबौद्ध (महार) समाज आहे. याशिवाय या गावात बेरड समाज आहे. या समाजाचा समावेश एन.टी.मध्ये आहे.

मौजे कार्वे ग्रामपंचायतीने रस्ते, गटर्स, समाजमंदिर, नळ पाणी पुरवठा इत्यादी कामे केलेली आहेत. ग्रामपंचायतीने दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी, आमदार निधी, खासदार निधी, वित्त आयोगातील निधी, ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील १५ टक्के रक्कम इत्यादींचा वापर हा दलित वस्ती सुधारणा करण्याकरीता खर्च केला आहे.

मौजे कार्वे या गावात दलित समाजातील महार आणि बेरड समाज आहेत. यातील बेरड समाजाची संख्या गावात अधिक आहे. महार आणि बेरड समाजाची घरे जवळ–जवळ लागून आहेत. त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्याचे संबंध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नरवीर उमाजीराव नाईक यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला दोन्ही समाज एकत्र असतात. यातून दोन्ही समाजामध्ये ऐक्य असल्याचे दिसते.

मौजे कार्वे गावातील सवर्ण आणि बेरड समाज यांच्यातील परस्पर सहकार्याचे आणि सलोख्याचे संबंध आहेत. बेरड समाज संख्येने अधिक असल्याने सवर्ण समाजाला राजकारणासाठी हा समाज उपयुक्त ठरतो. याचबरोबर महार समाज आणि मराठा समाज यांची घरे जवळ जवळ लागून असल्याने यांच्यामध्ये परस्पर सहकार्य आहे. बेरड, महार सवर्ण या समाजामध्ये एकोपा असल्याचे दिसून येते.

**३.१.८ बसर्गे** : बसर्गे गावची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १६५८ इतकी आहे. यातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २०८ आहे (जनगणना, २०११). याचे शेकडा प्रमाण १२.५४% आहे. या गावात अनुसूचित जातीतील प्रमुख जातीतील नवबौद्ध (महार) समाज आहे. या गावात भटक्या जातीतील (एन.टी.) मधील बेरड समाज आहे. बसर्गे गावातील ग्रामपंचायतीने दलित वस्तीत रस्ते, गटर्स, समाजमंदिर, पथ दिवे इत्यादी कामे केलेली आहेत.

बसर्गे गावात दलितांमधील महार आणि बेरड हे दोन्ही समाज आहेत. बेरड समाज महार समाजापेक्षा संख्येने कमी असल्यामुळे परस्परांमध्ये सहकार्य आहे. हे दोन्ही समाज जयंती, उत्सव इत्यादी कार्यक्रमात एकत्र सहभागी होतात. बसर्गेमधील सवर्ण व दलित या दोन्ही समाजात सामाजिक सलोखा आहे. गावातील वातावरण हे पुरोगामी विचाराचे आहे. गावातील सवर्ण दलितांना सहकार्य करताना दिसून येतात.

तक्ता क्र. १

चंदगड तालुका: गावनिहाय दलित वस्ती सुधारणा योजनेची कामे व खर्च

| तालुका | गावाचे नाव | सन | विकास कामे | अंदाजपत्रकीय रक्कम | विकास कामावरील खर्च |
|---|---|---|---|---|---|
| चंदगड | कुदनूर | २००९–१० | आरसीसी गटर्स | १,९५,३५७ | १,९५,३५७ |
| | माणगांव | २०११–१२ | काँक्रिट रस्ता | २०,००,९८२ | २०,००,००० |
| | राजगोळी | २०११–१२ | काँक्रिट रस्ता | १,९८,७३४ | २,००,००० |
| | कालकुंद्री | २०१२–१३ | काँक्रिट रस्ता | | २,०४,००० |
| | हेरे | २००२–०३ | नळ पाणी पुरवठा विहीर दुरूस्ती | २६०८९० | २,००,००० |
| | कागणी | २००८–०९ | काँक्रिट रस्ता | – | २,६४,२१७ |
| | कार्वे | २०१२–१३ | आरसीसी गटर्स | – | ३,५०,००० |
| | बसर्गे | २००८–०९ | खडीकरण, डांबरीकरण | २,०३,५३१ | २,००,००० |

(टीप – चंदगड तालुक्यातील गावातील दलित वस्ती सुधारणा योजनेतून केलेली कामे व विकास कामावरील खर्च यांचा संदर्भ, संदर्भ ग्रंथसूचीमध्ये देण्यात आलेला आहे).

तक्ता क्र. २

चंदगड तालुका: दलित वस्ती सुधारणा योजनेची एकूण कामे व खर्च

| विकास कामाचे नाव | २००२ ते २०१२ या कालावधीतील खर्च |
|---|---|
| काँक्रिट रस्ता | २६,६८,२१७/– |
| खडीकरण, डांबरीकरण | २,००,०००/– |
| आरसीसी गटर्स | ५,४५,३५७/– |
| नळ पाणी पुरवठा व विहीर दुरूस्ती | २,००,०००/– |
| एकूण खर्च | ३६,१३,५७४/– |

(टीप – चंदगड तालुक्यातील गावातील दलित वस्ती सुधारणा योजनेतून केलेली कामे व विकास कामावरील खर्च यांचा संदर्भ, संदर्भ ग्रंथसूचीमध्ये देण्यात आलेला आहे).

चंदगड तालुक्यातील संशोधनासाठी निवडलेल्या ८ गावांत सर्वात अधिक खर्च कॉंक्रिट रस्ता किंवा खडीकरण या विकास कामावर झालेला आहे. हा एकूण खर्च २६,६८,२१७ इतका आहे. या तालुक्यातील २००२ ते २०१२ या कालावधीतील दुसऱ्या क्रमांकाचा खर्च आरसीसी गटर्स यावर झालेला आहे. हा खर्च ५,४५,३५७ इतका आहे. नळ पाणी पुरवठा, विहीर दुरूस्ती याकरीता २,००,००० रू. खर्च झालेला आहे. हा तालुका डोंगराळ व दुर्गम भाग असलेला आहे. त्यामुळे या तालुक्यातील रस्त्यांच्या कामाला अधिक प्राधान्य दिलेले आहे.

समारोप : चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजना प्रभावीपणे राबविण्यामध्ये अनुसूचित जातीचे प्रतिनिधी आणि अनुसूचित जातीतील जागृत नागरिक यांच्यामुळे योजनेचे काम फलदायी दिसते. चंदगड तालुक्यातील अस्पृश्यतेचे प्रमाण काही प्रमाणात असलेले दिसते. समाजातील काही लोक अस्पृश्यतेसारखी अमानवीय प्रथा पालन करतांना दिसतात. तरीदेखील या गावातील दलित आणि सवर्ण यांच्यातील संबंध हे परस्पर सहकार्य व सलोख्याचे दिसतात. योजनेच्या माध्यमातुन या तालुक्यात दलित वस्तीतील विविध कामे केलेली आहेत.

**निष्कर्ष :**

१. चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी हा दलित वस्ती सुधारणेसाठी खर्च केलेला आहे. तक्ता क्र. १ मध्ये दलित वस्ती सुधारणेसाठी वापरलेला निधी दर्शविलेला आहे. याच बरोबर संशोधकाने प्रत्यक्ष दलित वस्तीला भेटी दिलेल्या आहेत.

२. चंदगड तालुक्यातील दलित वस्ती सुधारणेसाठी या योजनेमार्फत कॉंक्रिट रस्ता खडीकरण, डांबरीकरण, आरसीसी गटर्स, नळाद्वारे पाणी पुरवठा व विहीर दुरूस्ती इत्यादी कामे दलित वस्तीसाठी केलेली दिसतात.

३. तक्ता क्र. २ नुसार दलित वस्ती सुधारणे योजनेअतर्गत २००२ ते २०१२ या कालावधीत सर्वात अधिक निधी कॉंक्रिट रस्ता करण्यासाठी वापरण्यात आला आहे.

संदर्भ :

१. गावातील नागरिक व लोकप्रतिनिधींच्या मुलाखती
२. शासन निर्णय क्रमांक: दवसु–२०११/प्र.क्र.४४२/अजाक.
३. कुदनुर या गावातील दलित वस्तीसाठी २००९–२०१० मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु बद्दल प्रस्ताव २०१२/५४६/२१/०५/२०१२
४. **माणगाव** या गावातील दलित वस्तीसाठी २०११–२०१२ मध्ये मिळालेलया निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु/आदेश क्र. ३/प्र.मंजुरी/१२९७ दि. २९/१२/२०११.
५. **राजगोळी** या गावातील दलित वस्तीसाठी २०११–२०१२ मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु/आदेश क्र. २/२०११–१२/प्र.मंजुरी/१२८९/२९/१२/ २०११.
६. **कालकुंद्री** या गावातील दलित वस्तीसाठी २०१२–२०१३ मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु/आदेश–१/२०१२–२०१३/प्र. मंजुरी/११७३ दि. ३१/१२/२०१२.
७. **हेरे** या गावातील दलित वस्तीसाठी २००२–२००३ मध्ये मिळालेल्या निधीची जिल्हा परिषद समाजकल्याण विभागातील नोंद वहीत नोंद केलेली आहे.
८. **कागणी** या गावातील दलित वस्तीसाठी २००८–२००९ मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु/१/२००८/प्र.मंजुरी/२००८–०९/१०४७/दि.१९/१२/२००८.

ISSN 2277-8063

९. **कार्वे** या गावातील दलित वस्तीसाठी २०१२–१३ मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र.कोजिप/सकवि/दवसु/१/२०१२–१३/प्र.मं/११७३/दि.१३/१२/२०१२.
१०. **बसर्गे** या गावातील दलित वस्तीसाठी २००८–२००९ मध्ये मिळालेल्या निधीचा आदेश क्र. कोजिप/सकवि/दवसु/१/२००८/प्र.मंजुरी/२००८ –२००९/१०४७/दि. १९/१२/२००८.